**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**बुधवार, दिनांक : ३ एप्रिल, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **चुकीच्या माहितीचा प्रसार रोखण्यासाठी निवडणूक आयोगाकडून "मिथक विरुद्ध तथ्ये रजिस्टर' सुरु.**
2. **विदर्भातील सर्व** 10 **जागांवर महायुतीचे उमेदवार जिंकून येतील - राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला विश्वास, पंतप्रधान मोदींच्या रामटेक दौऱ्याला दिला दुजोरा.**
3. **दुसऱ्या टप्प्यासाठी वायनाड मधून काँग्रेसचे राहुल गांधी तर वर्धा इथं महायुतीचे रामदास तडस आणि अकोला इथं अनुप धोत्रे यांनी भरले नामांकन अर्ज.**

**आणि**

4. **विदर्भात बहुतांश जिल्ह्यात कमाल तापमान ४१ अंश सेल्सियसच्या पलीकडे, अकोला ठरला सर्वात उष्ण जिल्हा.**

#####

**"मिथक विरुद्ध तथ्ये**

चुकीच्या माहितीचा प्रसार रोखण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रियेची सचोटी टिकवून ठेवण्यासाठी, केंद्रीय निवडणूक आयोगाने सार्वत्रिक निवडणुका 2024 चा एक भाग म्हणून "मिथक विरुद्ध तथ्ये रजिस्टर' सुरु केलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू यांच्यासह नवी दिल्ली येथील निर्वाचन सदन इथं या उपक्रमाचा प्रारंभ केला. निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळाद्वारे "मिथक विरुद्ध तथ्ये रजिस्टर' जनतेसाठी उपलब्ध आहे. खोटी माहिती खोडून काढून खरी माहिती समोर आणण्यासाठी तसेच नवीन एफएक्यू अर्थात वारंवार विचारले जाणारे प्रश्न समाविष्ट करण्यासाठी रजिस्टरचे तथ्यात्मक मॅट्रिक्स नियमितपणे अपडेट केले जातील. चुकीच्या माहितीचे प्रसारण हे एक मोठं आव्हान असल्यानं निवडणूक प्रक्रियेचे चुकीच्या माहितीपासून रक्षण करण्यासाठी निवडणूक

आयोगाकडून सुरु असलेल्या प्रयत्नांमध्ये "'मिथक विरुद्ध तथ्ये रजिस्टर' हा एक मैलाचा दगड आहे. नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

**मतदान जनजागृती नागपूर**

नागपूरचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या हस्ते आज मतदार जनजागृती चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी रामटेक लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तुषार ठोंबरे यांच्यासह अधिकारी तसच कर्मचारी उपस्थित होते.

**आर के सिंग**

येत्या उन्हाळ्यात विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी सरकार सर्व ती पावलं उचलत असल्याचं केंद्रीय ऊर्जा तसंच नवीन आणि अक्षय ऊर्जा मंत्री आर के सिंग यांनी सांगितलं. यासंदर्भात अनेक बैठका झाल्यानंतर ते काल नवी दिल्लीत बोलत होते. उन्हाळ्यात अजिबात भारनियमन केलं जाऊ नये यावर त्यांनी भर दिला. त्यांनी वीज उत्पादक कंपन्यांशीही या विषयावर चर्चा केली आणि देशातल्या वीज साठ्याचा आढावा घेतला. यंदाच्या उन्हाळ्यात वायव्य, ईशान्य, मध्य आणि द्वीपकल्पीय भारत वगळता देशभरात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवल्यामुळे यंदा विजेची मागणी अधिक असेल, त्यामुळे सरकार त्यासाठी पूर्वतयारी करत आहे असं त्यांनी सांगितलं.

**उदय सामंत-नागपूर**

विदर्भातील लोकसभेच्या दहा मतदारसंघांत महायुतीच्या उमेदवारांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून विदर्भातील सर्व 10 जागांवर महायुतीचे उमेदवार जिंकून येतील असा दावा राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज नागपूरात आयोजीत पत्रकार परिषदेत केला .दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येत्या 10 तारखेला रामटेक लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार राजु पारवे यांच्या प्रचारार्थ सभा घेणार असुन या सभेला राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, केंद्रिय मंत्री नितिन गडकरी आणि महायुतीचे इतर प्रमुख नेते उपस्थित राहणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**'लोकनिर्णय महाराष्ट्राचा'**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं आपल्यासाठी सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल.

**राहुल गांधी**

केरळातल्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी कलपेट्टा इथं एका रोड शोचं नेतृत्व केलं. त्यांच्यासोबत पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी, के सी वेणुगोपाळ आणि इतर नेते उपस्थित होते. एलडीएफ उमेदवार ॲनी राजा हेही आज अर्ज दाखल करणार आहेत. केरळचे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष के सुरेंद्नन हे या मतदारसंघातून उद्या अर्ज भरणार आहेत. त्यामुळे या मतदारसंघात तिरंगी लढत होणार आहे. केरळात दुसऱ्या टप्प्यात या महिन्याच्या २६ तारखेला मतदान होणार आहे. उद्या उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. पाच तारखेला छाननी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आठ तारखेपर्यंत आहे.

**रामदास तडस / अनुप धोत्रे / दिनेश बुब**

वर्धा लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार रामदास तडस यांनी आज आपला उमेदवारी अर्ज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दाखल केला. यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे, माजी मंत्री सुबोध मोहिते, आमदार दादाराव केचे, आमदार समीर कुणावर, माजी मंत्री अशोक शिंदे उपस्थित होते. तत्पूर्वी स्वाध्याय मंदिर ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत रॅली काढत खासदार रामदास तडस यांनी शक्ती प्रदर्शन केले.

भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अनुप धोत्रे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे अकोल्यात आले होते. भारतीय जनता पक्ष कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत रॅली काढत भारतीय जनता पक्षाने जोरदार शक्ती प्रदर्शन केले.

आज अमरावती मधून प्रहार पक्षाचे उमेदवार दिनेश बुब यांनी नामांकन अर्ज दाखल केला आहे. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू, मेळघाटचे आमदार राजकुमार पाटेल, आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील अनेक प्रलंबित प्रश्नांना निकाली काढण्यासाठी आपण उमेदवारी दाखल केली असून अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचं आश्वासन यावेळी बुब यांनी दिल.

**हवामान**

विदर्भात सर्वत्र उष्णतेच्या झळा जाणवत आहेत. बहुतांश जिल्ह्यात तापमान हे ४० ते ४१ अंश सेल्सियस दरम्यान आहे. विदर्भात आज सर्वाधिक कमाल तापमाची नोंद अकोला इथं ४१ पूर्णांक ८ अंश सेल्सियस इतकी करण्यात आली. ४१ अंश तापमान असलेल्या विदर्भांच्या

अन्य शहरांमध्ये नागपूर, वर्धा, चंद्रपूर, वाशीम आणि यवतमाळ यांचा समावेश आहे. उर्वरित बुलढाणा, अमरावती, गडचिरोली, भंडारा इथं तापमान ४० अंश किंवा आसपास आहे.
सर्वत्र लोकसभा निवडणुकीची तयाची सुरु असून विदर्भातील ज्या मतदान केंद्रावर पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे त्या ठिकाणी उष्मा प्रतिबंधक उपाय योजना करण्यात येत आहेत.

**अवैध वाळू उत्खनन**

भंडारा जिल्ह्यातून वाहणाऱ्या वैनगंगा नदीच्या वाळूला अनेक जिल्ह्यांतून मागणी असल्याने अवैध वाळू उत्खननाचं प्रमाण वाढलं आहे. नुकतंच भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील आष्टी बावनथडी भागात अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्या 7 टिप्परवर कारवाई करून 1 कोटी 41 लाख 56 हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. खनिकर्म विभाग आणि गोबरवाही पोलिसांनी ही कारवाई केली.

**एनसीईआरटी**

राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद -एनसीईआरटीच्या सर्व शालेय अभ्यासक्रमांची पुस्तकं विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचं परिषदेनं सांगितलं. सर्व विद्यार्थी आणि पालकांना पुस्तकं वेळेवर मिळण्याचं आश्वासन देत, अनेक राज्यांमध्ये शालेय पुस्तकं उपलब्ध नसल्याच्या सामाजिक माध्यमांवरील वृत्तानंतर परिषदेनं हे स्पष्ट केलं आहे.

**बिबट जीवनदान**

भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील मोहघाटा इथं वासुदेव भांडारकर यांच्या शेतातील विहिरीत काल रात्री बिबट पडल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाने बिबट्याला विहिरीच्या बाहेर काढून जीवनदान दिलं.

**उद्धव ठाकरे**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज लोकसभा निवडणुकांसाठी आपल्या चार उमेदवारांच्या नावांची घोषणा केली.कल्याण लोकसभा मतदारसंघातून वैशाली दरेकर, पालघर लोकसभा मतदारसंघात भारती कामडी, जळगाव लोकसभा मतदातसंघासाठी करण पवार आणि हातकंणगले मतदारसंघात सत्यजित पाटील यांना उमेदवारी दिल्याचं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलं.

**जागतिक बँक**

२०२४ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साडेसात टक्के दरानं होईल, असा सुधारित अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे. जागतिक बँकेनं आधी या वर्षासाठी जो अंदाज व्यक्त केला होता त्यात  एक पूर्णांक दोन दशांश टक्क्यांची वाढ करून हा सुधारित अंदाज जाहीर करण्यात आला आहे. दक्षिण आशिया विकासासंदर्भातल्या ताज्या अहवालात ही माहिती दिली आहे. येत्या दोन वर्षांत दक्षिण आशिया हा विभाग जागतिक पातळीवर सर्वाधिक विकसनशील विभाग ठरेल, आणि २०२५ या वर्षात त्याचा विकासदर सहा पूर्णांक एक दशांश टक्के असेल, असंही या अहवालात म्हटलं आहे.

#####